# सामाजिक समस्या आणि पर्यावरण बदल

**डॉ. पुरुषोत्तर वारलू रामटेके,**
समाजशास्त्र विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक,
चिश्तिया कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, खुल्ताबाद, जि. औरंगाबाद.
ramtekepw@gmail.com
९६२३५६१९८६

---

**प्रस्तावना :**

पर्यावरणात निर्माण होणाऱ्या या नैसर्गिक आपत्तींमुळे किती प्रमाणात पर्यावरणात बदल होतात व त्याचा परिणाम समाजावर काय व कसा होतो? हे मानव समाज ठरवू शकत नाही. कारण कोणत्याही व्यवस्थेत होणारे बदल हे आपल्याला दिसत नाही. पण पर्यावरणाचा होणाऱ्या बदलाचा परिणाम मानवी समाजावर होतो. पर्यावरणीय बदल व मानव निर्मित नाही, पण पर्यावरण पोषक बनविणे हे मानवी समाजावर अवलंबून आहे.

भारताच्या एकूण ३२लाख ८७ हजार २६३ चौ.कि. पैकी, पूर, दुष्काळ, भूकंप इ. नैसर्गिक आपत्तीला भारत देश कित्येक वेळा सामोरे गेलेला आहे. पर्यावरण बदलाचे रूपांतर आपत्तीत कशा पद्धतीने रूपांतरित होते, याची माहिती उपलब्ध असली तरी त्याचे योग्य मूल्यमापन करण्यासाठी भारतातील 'नॅशनल ॲटलास ॲण्ड थिमेटीक मॅपींना ऑरगनायझेशन' याच बरोबर सेंन्ट्रल पोल्यूशन कंट्रोल बोर्ड ही संस्था काम करत असून इ.स. २००१ पर्यन्त हे काम पूर्ण होईल असा त्याचा अंदाज आहे.
या शोध निबंधात अभ्यासाचा हेतू : भारतीय बदलत्या पर्यावरणाचा अभ्यास करणे हा आहे.

१. भारतातील पर्यावरणीय बदल त्याचे स्वरूप व परिणाम समजावून घेणे.
२. या विषयाचे ज्ञान व माहिती प्राप्त करणे.
३. पर्यावरण बदलाचे कारण शोधून घेणे.
४. पर्यावरण बदलापासून समाजाची हाणी कमी होईल, असे बचावात्मक उपाय शोधणे.
५. पर्यावरण परिस्थितीची ओळख करून त्यांच्या तोंड देण्यासाठी समर्थ बनते.[१]

जागतिक पातळीवर अभ्यासण्याजोगा स्पष्टपणे जाणवणाऱ्या घटनांचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करून त्यानुसार सैद्धांतिक मांडणी व संकलनांची नवनिर्मिती होणे आधुनिक संशोधकांना आवश्यक वाटते.

पर्यावरणाचा विविध घटकांमध्ये क्रिया—प्रतिक्रिया सतत सुरू असतात. निसर्ग निर्मात्यांनी या क्रिया—प्रतिक्रियांचे नियमन होत असते, त्यातून विविध प्रकारच्या पर्यावरण रचना निर्माण होतात. त्यांनाच परिसंस्था (Ecosytem) असे म्हणतात. पर्यावरणातील मानवाच्या अतिरेकी हस्तक्षेपामुळे या परिसंस्थांचा समतोल बिघडला आहे. साधारणपणे पर्यावरणाचे प्रमुख दोन प्रकारांत वर्गीकरण केले जाते. नैसर्गिक पर्यावरण व सांस्कृतिक पर्यावरण.

**पर्यावरणाचे महत्त्व :**

१. मानव पर्यावरण सहसंबंध व आंतरक्रीयांचे आकलन होण्यास मदत होते.

२. पर्यावरण शास्त्राच्या अभ्यासामुळे पृथ्वीवरील परिसंस्थाचे ज्ञान होते.

३. मानव प्राण्याच्या मर्यादा ओळखण्यास मदत होते.

४. साधनांचे वितरण, मर्यादा, स्वरूप यांचे ज्ञान होते.

पर्यावरण प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवनिर्मित घटकांचा प्रदूषके असे संबोधता येईल. प्रदूषकामुळे प्रदूषण होते, दूषित पदार्थ, मानवनिर्मित द्रव्ये याबरोबरच अनियंत्रित उर्जा देखील प्रदूषकांमध्ये समाविष्ट आहे. मानवाच्या श्रवणशक्तीपेक्षा अधिक तीव्रतेच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषित होते, पाण्यापासून वीज निर्माण करणाऱ्या जलविद्युत केंद्रातील गरम पाणी नदीपात्रात सोडल्याने औष्णिक प्रदूषण होते. परंतु या दोन्ही ठिकाणी उर्जा नियंत्रित केली गेली तर ती प्रदूषके ठरतात. म्हणून आपल्याला विविध पर्यावरणातील घटकांना अनुसरून प्रदूषणाचे विविध प्रकार दिसतात. उदा. हवा प्रदूषण, माती प्रदूषण, जल प्रदूषण, सागरी प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, औष्णिक प्रदूषण इ. यातून या मानव समाजावर संकटे येत असतात. आज गेल्या दोन वर्षापासून भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात कोरोनाचे संकट अजून तरी संपलेले नाही. याचा विचार आजच्या आधुनिक समाजाने समजून घ्यावयाचे आहे. कारण मानवनिर्मित आपत्ती व निसर्गनिर्मित आपत्ती या दोनच आपत्ती प्रामुख्याने विचारात घ्यावयाच्या आहेत, कारण आपत्ती ही सांगून येत नसते. मानवी आपत्तीची माहिती समाजाला होते. नैसर्गिक आपत्तीची पूर्वकल्पना समाजाला समजू शकत नाही. मग भारतीय समाजात विविध जाती धर्माचे लोक आज आपल्याला नैसर्गिक पर्यावरणावर अत्याचारच करतांना दिसून येतात ते कुठे तरी थांबले पाहिजे.

१. पर्यावरणाच्याबाबत निर्माण झालेली जाणीव व नैसर्गिक साधनसामुग्रीचा संहार केल्यामुळे पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, या प्रश्नांचा अभ्यास 'जागतिक प्रश्न' म्हणूनच करावा लागेल. दृष्टीचा संहारास "विकास म्हणून संबोधले जाते. पण त्यांचे परिणाम व्यापक व दूरवरच्या क्षेत्रापर्यंत पोहोचतात. हवामानातील बदल, वाढते तापमान व प्रदूषणाच्या कक्षा आता मर्यादित क्षेत्रापुरत्या राहत नाहीत. तसेच या विनाशकारी प्रक्रियांचा वारसा वर्तमान पिढीला नव्हे तर तर भविष्यातील पुढील पिढ्यांना आपण बहाल करणार आहोत काय? ही चिंतेची बाब आहे. पर्यावरणासंबंधीचे प्रश्न आता स्थानिक प्रश्न म्हणून सोडविता येणार नाहीत. ते संपूर्ण मानव समाजाला आव्हान ठरू पाहत आहेत.

२. प्रत्येक देशातील आर्थिक व राजकीय परिस्थिती भिन्न असल्यामुळे पर्यावरण विषयक समस्यांचे निराकरण करण्यांवर कितपत लक्ष केंद्रित करावे हे स्थानिक जनता व सत्ताधारी आज स्वतंत्रपणे ठरवू शकत नाहीत. प्रत्येक विकसनशील देशाची उत्पादनप्रक्रिया आज जागतिक बाजारपेठेच्या नियमानुसार वाढते, यामुळे पर्यावरणवादी राजकारण व अर्थकारण यांचा प्रभाव महत्त्वाचा ठरतो. आज पाश्चात्य तंत्रज्ञान व बहुराष्ट्रीय कंपन्यांचा प्रभाव पडून राष्ट्रीय सार्वभौतित्त्व धोक्यात येते. त्या देशांमधील उत्पादन तंत्रे वापरून स्थानिक साधनसामुग्रीचा नाश होतो. स्थानिक संस्कृती व अनुभाधिष्ठित ज्ञान मागे पडते. नैसर्गिक प्रक्रियांचा समतोल बिघडतो, व जैविक बहुविधवा (Bio - Diversion) धोक्यात येते.

१. पर्यावरणवादी चळवळींकडे नव वसाहतवादाला आव्हान देणारे संघटीत प्रयत्न म्हणून काही विचारवंत आज त्याकडे पाहतात. भांडवलशाही व्यवस्था व उदारीकरणाचे धोरण विकसनशील गरीब

देशांमधील पर्यावरणाच्या नाशास कारणीभूत होतात काय? या संदर्भात समाजशास्त्रीय चिंतन होणे आवश्यक आहे.

४. पर्यावरण आणि लोकसंख्या यांचा घनिष्ठ परस्परसंबंध आहे. मात्र लोकसंख्येचे वितरण समान नाही. भारतामध्ये लोकसंख्या वाढ व लोकसंख्येची घनता यामुळे संसाधनांचा वापर वाढतो व सर्व संसाधने पुनरूत्पादनक्षम नसतात. विकसित देशामध्ये लोकसंख्या कमी असून देखील संसंधानाचा उपयोग विकसनशील देशापेक्षा अनेक पटीने जास्त आहे, व पर्यावरणावरील त्याचे दुष्परिणाम मात्र गरीब देशांना अधिक भागावे लागतात. (हरितगृह परिणाम Green House effect) व वाढत्या जागतिक तापमानाचे उदाहरण येथे देता येईल.

**पर्यावरण प्रदूषणावर उपाय :**

वेगवेगळ्या प्रकारचे नैसर्गिक व मानवी हवेच्या प्रदूषणास कारणीभूत आहेत, परंतु काही नैसर्गिक घटकास हवेचे शुद्धीकरण करतात, वाढत्या मानवी क्रियांमुळे नैसर्गिक शुद्धीकरण प्रक्रिया अपूरी पडत आहे, म्हणूनच हवेचे वाढते प्रदूषण थांबविण्यासाठी मानवी क्रियांवर निर्बंध घालणे अत्यावश्यक आहे. वारा, सूर्यप्रकाश, पाऊस आणि वनस्पती हे नैसर्गिक घटक हवेच्या शुद्धीकरणात केले जाते. तसेच त्या जागी शुद्ध व स्वच्छ हवेचा पुरवठा केला जातो, विषारी वायूची हवेतील तीव्रता काही करण्याचे कामही वारा करतो. महानगरातील गगनचुंबी इमारती वायू विजनात अडथळे निर्माण करतात, त्यामुळे इमारतची उंची तसेच दोन इमारतीचे अंतर याचे नियमन केल्यास वायूविजनात अडथळे निर्माण करतात, त्यामुळे इमारतीची उंची तसेच दोन इमारतीचे अंतर याचे नियमन केल्यास वायूविजन व्यवस्थित होवून प्रदूषण कमी होण्यास मदत होते.

आज बेसूमार जंगलतोडीमुळे वनस्पतीचे प्रमाण व पर्यायाने वातावरणातील ऑक्सीजनचे प्रमाण कमी झाले आहे, हवेच्या प्रदूषण नियंत्रणासाठी नव्यानो जंगल लागवड करणे आवश्यकच बनले आहे. सामाजिक वनीकरणाअंतर्गत ‘‘झाडे लावा झाडे जगवा’’ ही मोहीम महत्त्वपूर्ण आज ठरते.

**निष्कर्ष :**

जगभरात पर्यावरण जवळपास सारखेच आहे, कोणत्याही एका प्रदेशात होणारी पर्यावरण विरोधी कारवाई अन्य देशातील पर्यावरणास हानीकारक आहे, आज भारतीय समाजाच्या आपत्तीला सामोरे जात आहे, त्याचे कारण सुद्धा पर्यावरणच आहे आणि आज समाजातील प्रत्येक व्यक्ती जोपर्यंत पर्यावरण पूरक अशा कृती करणार नसतील तर भविष्यात जमिनीवर एकही मनुष्य प्राणी शिल्लक राहणार नाही. आपल्या देशात प्रदूषण रोखण्यासाठी वेगवेगळे प्रदूषण निमंत्रण कायदे तयार करण्यात आले आहेत, त्याची अंमलबजावणीही होत आहे, पर्यावरण व्यवस्थापन या संदर्भात लोकांमध्ये जागृती करण्यात येत आहे, पर्यावरण संरक्षणासाठी तसेच संवर्धनासाठी वेगवेगळ्य पुरस्कारांची योजना चालू आहे, पण त्याचा फारसा फायदा झालेला नाही.

**संदर्भ :**

१. पाटील आर.जी. (मार्च २००१), साई एन्टरप्रायजेस अनुधम टेरेस, ७५४/बी, कोधरूड, पुणे, २१ – (प्रथमावृत्ती) पृ.क्र. २३

२. कुलकर्णी, दिक्षीत, सोंडगे, डिस्प्ले (जानेवारी २०१४), शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद.

३. Prashanth, Jon Disy, Kulkarni, Karlekar, Environmental Studies Published by - Dattatray G. Pashte Diamond Publications 1691, Sadashiv Peth, Shankarprasad. C.H.S. Tilak raod, Pune, November, 2006.

४. कुलकर्णी दीक्षीत, सोंडगे, डिसले, पर्यावरणशास्त्र, शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक्स, पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद, जून, २००४, पृ.क्र. ११४.

५. कर्नल (निवृत्त) मराठे, गोडबोले, (जानेवारी २००७), आपत्ती व्यवस्थापन संकल्पना आणि कृती (द्वितीय आवृत्ती), डायमंड पब्लिकेशन्स, १६९१, सदाशिव पेठ, शंकर प्रसाद, को.हा.सो, ग्राहक पेठेजवळ, टिळक रोड, पूणे, ३०.

६. मासलेकर आनंद : वन व्यवस्थापन, कॅन्टिनेन्टक प्रकाशन, विजयनगर, पुणे, ३०.

७. घानेकर, व्हि.व्हि. (१९८६) वनसंपत्ती, प्रेषक प्रकाशन पुणे, ४११००४.

८. पाटिल पि.टी. मूळे, अडसूल (१९९८) : पर्यावरण भूगोल, सप्रेम प्रकाशन, कोल्हापूर.